# महाराष्ट्र शासन
# जिल्हा रोजगार
# व
# स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र,सोलापूर.

**विविध योजना व कार्यालय कामकाजाच्या पध्दतीची माहिती**

दुरध्वनी क्रमांक- २६२२११३ , ई-मेल-rojgarad_solapur.yahoo.com.

वेबसाईट- http://ese.mah.nic.in

**कार्यालयाच्या कार्यपध्दतीची माहिती**

जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र,सोलापूर हे कार्यालय राज्यशासनाचे कार्यालय असून हे पद्मशाली भवन,८/९ रविवार पेठ,कन्ना चौक,सोलापूर येथे १९८५ पासून पद्मशाली ज्ञाती संस्था यांचे मालकीच्या इमारतीत भाडे तत्वावर कार्यरत असून या कार्यालयाचे क्षेत्रफळ २४१४ स्केअर फुट आहे.

देशातील लोकसंख्येच्या प्रमाणांत सेवायोजन सेवेचा लाभ कशा प्रकारे जनतेला देता येईल याचा विचार करण्याकरिता १९५४मध्ये शिवराव कमिटीने केलेल्या शिफारसीनुसार १९५६मध्ये केंद्र शासनाने राष्ट्रीय सेवायोजन संघटनेचे कामकाज राज्य शासनाकडे हस्तांतरित केली. सद्यस्थितीत महाराष्ट्रात ४६ सेवायोजन कार्यालये कार्यरत आहेत.महाराष्ट्र शासनाने १मे १९९७पासून रोजगार व स्वयंरोजगार या स्वतंत्र विभागाची स्थापना केली. या विभागाकडे शासनाचा महत्वकांक्षी रोजगार व स्वयंरोजगार निर्मितीचा कार्यक्रम परिणामकारकपणे राबविण्याचे महत्वाचे कार्य सोपविलेले आहे.

जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रामार्फत बेरोजगार उमेदवारांची नांव नोंदणी करण्यांत येते. उद्योजकाकडून प्राप्त होणा-या मागणी संदर्भात पात्र उमेदवारांची जेष्ठतेप्रमाणे पाठवणी करणेचे काम करण्यांत येते. त्याप्रमाणे पगारी नोक-या कमी/अत्यल्प असल्यामुळे आणि नोकरी मागणा-या उमेदवारांची संख्या मोठी असल्यामुळे सर्वांना नोकरी मिळणे अशक्य असल्याने उमेदवारानी स्वतःचा स्वयंरोजगार सुरु करावा याबाबत मार्गदर्शन करण्यांत येते. तसेच शासनाकडून निरनिराळया कार्यालयाकडून,मंडळाकडून राबविण्यांत येणा-या स्वयंरोजगार योजनांची माहिती देवून उमेदवारांना स्वयंरोजगारासाठी प्रवृत्त करण्यांत येते.

**<u>नांव नोंदणी-</u>** या कार्यालयात निरक्षरापासून ते पदवीधरापर्यंत तसेच आय टी आय व तत्सम् व्यावसायीक अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या सर्व उमेदवारांची नांव नोंदणी करता येईल.पदव्युत्तर तांत्रिक व्यावसायिक पदवीधर,वैद्यकीय व कायदेविषयक पदवीधर या उमेदवारांची नांव नोंदणी विद्यापिठ रोजगार व स्वयंरोजगार माहिती व मार्गदर्शन केंद्र,शिवाजी विद्यापिठ,कोल्हापूर येथे करणेंत येते. **सध्या सोलापूर येथे सोलापूर विद्यापिठाची स्थापना झाली असून सोलापूर विद्यापिठात पदव्युत्तर व तांत्रिक आणि व्यावसायिक पदवीधर उमेदवारांची नोंदणी सोलापूर येथे प्रत्येक महिन्याच्या तिस-या शुक्रवारी करण्यांत येते.** त्यामुळें सोलापूर जिल्हयातील पदव्युत्तर उमेदवारांची ( सोलापूर विद्यापिठ येथे)नांव नोंदणी, नुतनीकरण,शैक्षणिक पात्रतेची वाढ व इतर कामासाठी सोईचे झाले असून त्यांना कोल्हापूर येथे सदरहू कामासाठी जावे लागत नाही.

या कार्यालयातर्फे तालुकास्तरावर फिरते नांव नोंदणी पथक महिन्यातून एकदा प्रत्येक तालुक्यात निश्चीत केलेल्या तारखाना पंचायत समिती येथे नोंदणीसाठी जात असून त्याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

१) पचांयत समिती बार्शी दिनांक-६
२) पंचायत समिती कुर्डुवाडी दि. ८
३) पंचायत समिती माळशिरस दि. ११
४) पंचायत समिती मंगळवेढा- दि १३
५) पंचायत समिती पंढरपूर दि. १६
६) पंचायत समिती मोहोळ- दि. १८
७) पंचायत समिती सांगोला दि. २३
८) पंचायत समिती करमाळा दि. २५
९) पंचायत समिती अक्कलकोट दि. २७

**<u>नोंदणी केलेल्या उमेदवारांची वर्षनिहाय सांख्यीकी माहिती</u>**

| वर्ष | १,९९८ | १,९९९ | २,००० | २,००१ | २,००२ | २,००३ | २,००४ | २००५ | २,००६ | डिसे-०७ अखेर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पुरुष | २०,८५३ | २२,९२८ | २२,४४२ | १७,८६७ | २०,१८१ | २६,०७१ | २५,३७१ | २२,१७३ | ११,०५६ | १३,६३० |
| स्त्रि | ४,०१३ | ५,१९३ | ५,०५५ | ४,१०८ | ३,८१६ | ५,०३० | ६,५३९ | ५,०६५ | १०,६१६ | ८,६९८ |
| एकूण | २४,८६६ | २८,१२१ | २७,४९७ | २१,९७५ | २३,९९७ | ३१,१०१ | ३१,९१० | २७,२३८ | २१,६७२ | २२,३२८ |

**<u>३१ डिसेंबर अखेर नोंदणी पटावर असलेल्या उमेदवारांची सांख्यीकी माहिती</u>**

| वर्ष | १,९९९ | २,००० | २,००१ | २,००२ | २,००३ | २,००४ | २००५ | २,००६ | डिसेंबर ०७ अखेर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पुरुष | ११०,७२६ | ११५,९४३ | ११२,६५९ | १०८,५७६ | १०८,६८६ | ११६,४४९ | ११६,८२३ | १०७,९९७ | ८१,५६४ |
| स्त्रि | २१,७२४ | २३,३१२ | २१,४७८ | १९,८२८ | १८,८११ | २१,०२४ | २१,०२८ | १९,७०८ | २३,७७१ |
| एकूण | १३२,४५० | १३९,२५५ | १३४,१३७ | १२८,४०४ | १२७,४९७ | १३७,४७३ | १३७,८५१ | १३८,४३३ | १०५,३३५ |

**माहे डिसेबर- २००७ अखेर सुशिक्षित उमेदवारांची शैक्षणिक पात्रतेनिहाय नोंदणीपट**

| अ.क्र. | शैक्षणिक पात्रता | महिना अखेर नोंदणीपटावर असलेले उमेदवार |
|---|---|---|
| १ | अशिक्षित | ४६ |
| २ | १ ली ते ४ थी | ३,४३८ |
| ३ | ८ वी व ९ वी पास | १६,८७२ |
| ४ | एस.एस.सी | ५१,७८४ |
| ५ | एच एस सी | १२,९०५ |
| ६ | इंजिनियरिंग पदवीकाधारक | ७०५ |
| ७ | डि. सी.ई. | ३३५ |

| | | |
|---|---|---|
| ८ | डी ई.ई | १४६ |
| ९ | डी. एम. ई | १४३ |
| १० | डिप्लोमा इतर | ८१ |
| ११ | आय टी आय ट्रेंड उमेदवार | ३,२९८ |
| १२ | अप्रेंटीस ट्रेड उमेदवार | ० |
| १३ | पदवीधर एकूण | १६,२७१ |
| १४ | बी. ए. | ९,९८६ |
| १५ | बी एस्सी | २,३६५ |
| १६ | बी कॉम | २,८९७ |
| १७ | बी एड/ बी पी एड | १,०२३ |
| १८ | पदव्यूत्तर एकूण | १६ |
| १९ | एम ए. | १६ |
| | एकूण नोंदणीपट | १०५,३३५ |

**रोजगारासाठी पाठवणी-** या कार्यालयात नांव नोंदणी केलेल्या उमेदवारांची पाठवणी उद्योजकांच्या मागणीनुसार संबधीत प्रवर्गातील जेष्ठतेनुसार पात्र उमेदवारांची करण्यांत येते. यामध्ये प्रवर्ग,शैक्षणिक पात्रता,वय,अनुभव यानुसार पात्र उमेदवारांची पाठवणी करण्यांत येते. यामध्यें १ रिक्तपदासाठी नियमानुसार १५ उमेदवारांची पाठवणी करण्यांत येते किंवा उद्योजकांनी मागणी केलेल्या प्रमाणांत उमेदवार पाठविले जातात. या कार्यालयाने पाठवणी केलेल्या उमेदवारांची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

| वर्ष | अधिसूचित रिक्तपदे | पाठवणी केलेले उमेदवार | नोकरीस लागलेले उमेदवार | प्रलंबित रिक्तपदे (वर्ष अखेरीस) |
|---|---|---|---|---|
| १,९९८ | १,५१५ | ८,८१५ | ५९१ | १७३ |
| १,९९९ | २,१४० | ९,२५५ | ४४५ | १,०४२ |
| २,००० | १,५५३ | ९,६३२ | ७८४ | ९२८ |
| २,००१ | १,३४३ | ९,६६५ | ५७८ | ४५८ |
| २,००२ | १,६२६ | १४,७६३ | ५३३ | ६७९ |
| २,००३ | १,४८५ | १८,३१८ | ३६८ | १,०१३ |
| २,००४ | ५९० | १२,३३८ | ३०१ | ६३९ |
| २,००५ | १,३६९ | ९,१२४ | ५७१ | ९२९ |
| २,००६ | १,५३९ | ११,०२६ | ६३१ | ९३४ |
| डिसे- ०७ अखेर | २,११३ | १३,२४१ | ७८८ | ६९२ |

**अपंग उमेदवारांची माहिती.-** या कार्यालयांत अपंग उमेदवारांची त्यांचे अपंगत्वाचे प्रमाणपत्र पडताळून नांवनोंदणी केली जाते. अपंग उमेदवारांचे तीन प्रकारात विभाजन होत असून ते अंध, अस्थिव्यंग व मुकबधीर या प्रमाणे नोंदणी केली जात असून त्यांची उद्योजकाकडून मागणी केल्याप्रमाणे प्रवर्गानुसार पाठवणी केली जाते. या कार्यालयांत नोंद केलेल्या व तसेच नोकरीस लागलेल्या उमेदवारांची प्रवर्गनिहाय मागणी.

| अ.क्र. | तपशील | २,००० | २,००१ | २,००२ | २,००३ | २,००४ | २,००५ | २,००६ | डिसे ०७ अखेर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | नोंदणी | ८४ | १९९ | २७९ | ३०४ | १८७ | १८३ | १९७ | १८० |
| २ | अधिसूचित पदे | २५ | ६ | ५ | ५ | ६ | २४ | १७४ | ६२ |
| ३ | नोकरीस लागलेले | ३ | ३ | २ | ४ | ३ | १४ | २२ | ३३ |
| ४ | नोंदणीपट | ५४३ | ५८३ | १,०९९ | १,२३७ | १,४२४ | १,४६५ | १,४९८ | १,५१० |
| ५ | अंध | १७ | १८ | ५६ | ४८ | ५५ | ४३ | ४० | ३१ |
| ६ | मुकबधीर | १० | ८ | ४२ | ४८ | ४४ | ४७ | ४० | ३४ |
| ७ | अस्थिव्यंग | ५१६ | ५५७ | १,००१ | १,१४१ | १,३२५ | १,३७५ | १,४१८ | १,४४५ |

**<u>रोजगार प्रोत्साहन कार्यक्रमः</u>**- केंद्रीय नियोजन मंडळाने आखून दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसर सुशिक्षित बेरोजगारी दूर करण्यासाठी शासनाने रोजगार प्रोत्साहन कार्यक्रम ही योजना १९७४ पासून
कार्यान्वित केली. या योजनेचे मुख्य उदिष्ट असे की, या योजनेव्दारे उमेदवारांना विविध व्यवसायाचे प्रशिक्षण खाजगी क्षेत्रातील तसेच सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम यातून मिळावे आणि त्यांचे कौशल्य व पात्रता वाढून त्यांचे स्वतःच्या कर्तबगारीवर आपले उज्वल भवितव्य घडविता यावे . प्रत्यक्ष व्यवसायाचे प्रशिक्षण मिळाल्यावर विकसित झालेल्या औद्योगिक क्षेत्रामध्ये त्यांना कायमस्वरुपी रोजगार मिळावा हाही हया योजनेचा मुख्य उद्येश आहे. उमेदवारांना खाजगी व सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम या मध्ये मागणी नुसार प्रशिक्षणासाठी पाठविण्यात येते. प्रशिक्षणाचा कालावधी सहा महिन्याचा असतो. व त्यांना त्यासाठी शैक्षणिक पात्रतेनुसार खालील प्रमाणे विद्यावेतन दिले जाते.

**विद्यावेतनाचे दर खालील प्रमाणेः-**

| अ.क्र. | शैक्षणिक पात्रता | दरमहा विद्यावेतन रुपये |
|---|---|---|
| १ ) | एस एस सी उत्तीर्ण | ३००/- |
| २ ) | तांत्रिक प्रमाणपत्रधारक (आय टी आय) | ३००/- |
| ३ ) | पदवीधर | ५००/- |
| ४ ) | पदवीधाकाधारक | ७००/- |
| ५ ) | नर्सिंग | ७००/- |
| ६ ) | पदव्युत्तर | ८००/- |
| ७ ) | इंजिनिअर पदवीधर | १०००/- |

रोजगार प्रोत्साहन कार्यक्रमाअंर्तगत झालेल्या कामांची माहिती पुढील प्रमाणे आहे :-

| अ क्र | तपशिल | १९९९-२००० | २०००-२००१ | २००१-२००२ | २००२-२००३ | २००३-२००४ | २००४-२००५ | २००५-०६ | डिसे. ०७ अखेर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | उद्दिष्ठ | २५ | २८ | १२० | १६० | २०० | २२५ | २५० | ३५० |
| २ | अधिसुचित रिक्त पदे | ९३ | ७३ | १४६ | ४०४ | २७६ | ६७५ | ६७९ | १०३४ |
| ३ | पाठवणी केलेले | ६०७ | ६१५ | १,६१६ | २,३५९ | १,९९६ | ४,२९२ | ६१६० | २७९४ |
| ४ | निवड केलेले | २६ | २९ | १२२ | १६१ | १४० | २२६ | २७२ | २४० |
| ५ | अर्थिक तरतूद | १५५,००० | २५३,००० | २२५,००० | २६०,००० | २७५,००० | ३००,००० | ६००००० | २२८५००० |
| ६ | एकुण खर्च | १५४,८६६ | २३०,३२८ | १९१,५६१ | २५९,९३१ | २७४,८२७ | २८६,७५३ | ४५०००० | २५१४०४ |
| ७ | सामावून घेतलेले | ११ | २६ | ११३ | १४२ | ६० | ८४ | ९० | १२० |

**<u>व्यवसाय मार्गदर्शन</u>** :- या कार्यालयामध्ये व्यवसायमार्गदर्शन विभागाची स्थापना करण्यात आलेली असून सेवायोजन कार्यालयाच्या कक्षामध्ये बेरोजगार उमेदवारांना विविध व्यवसायाची , विविध योजनांची माहिती मिळणे करिता विविध प्रकारची पुस्तके उपलब्ध करण्यात आलेली आहेत. जिल्हयातील अनेक उमेदवार येऊन या विभागास भेट देतात. व येथे उपलब्ध असलेल्या योजनांची माहिती करुन घेतात. सुशिक्षित बेरोजगारांना स्वयंरोजगाराबाबत या कक्षामधून स्वयंरोजगाराची माहिती देऊन जिल्हयातील ज्या विविध कार्यालयामधून स्वंयरोजगाराच्या योजना राबविल्या जातात त्या कार्यालयाची संपूर्णतः माहिती दिली जाते. जेणेकरुन बेरोजगार उमेदवारास इतरत्र फिरण्याची आवश्यकता भासत नाही. या कार्यालयाने जिल्हयामध्ये ज्या स्वयंरोजगाराच्या योजना उपलब्ध आहेत त्यांची एक पुस्तीका तयार करुन या कक्षामध्ये उमेदवारांच्या माहिती करिता ठेवलेली आहे. व्यवसाय मार्गदर्शनाबाबतची माहीती खालीलप्रमाणे

| तपशील | २००१-०२ | २००२-०३ | २००३-०४ | २००४-०५ | २००५-०६ | २००६-०७ | डिसे -०७ अखेर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| शाळा महाविद्यालय दिलेल्या भेटी | ६ | ५ | ३ | ५ | १७ | ९ | ७२ |
| **परिषदा व प्रदर्शन** | ८ | ४ | ३ | २ | २ | ३ | २ |
| परीषदा व प्रदर्शनास उपस्थित विद्यार्थी | १८० | ४८० | ४२५ | ७३३ | ७२५ | ६८१ | १४५० |
| **मेळावे** - | ५९ | २७ | ३४ | २१ | १० | १०९ | ८१ |
| मैळाव्यासउपस्थित उमेदवार | १,०७२ | १,२५२ | ५८५ | १५० | ६३२ | ६१९० | ६७४९ |

**<u>रोजगार मेळावे:-</u>** रोजगार व स्वयंरोजगार विभाग शासन निर्णय क्र.रोस्वरो-२००६/प्रक्र.४१/रोस्वरो-१ दि. २९ जून २००७ च्या शासनाच्या धोरणात्मक निर्णयानुसार या कार्यालयाने दि. ९/९/२००७ रोजी पहिल्या रोजगार मेळाव्याचे आयोजन मद्दा मंगल कार्यालय, सोलापूर येथे केलेले होते. तसेच दुस-या मेळाव्याचे आयोजन सांगोला शेतकरी सह. सुत गिरणी, सांगोला येथे दि. ३/११/२००७ रोजी आणि तिस-या रोजगार मेळाव्याचे आयोजन दि. २१/१२/२००७ रोजी आय टी आय, विजापूर रोडे सोलापूर येथे केले होते केले होते त्यांचा तपशील पुढीलप्रमाणे

| अ.क्र. | रोजगार मेळावा | आंमत्रित उद्योजकांची संख्या | उपस्थित उद्योजकांची संख्या | मुलाखतीस बोलाविलेले उमेदवारांची संख्या | मेळाव्यास उपस्थित उमेदवारांची संख्या | प्राथमिक निवड केलेल्या उमेदवारांची संख्य | अंतिम निवड झालेल्या उमेदवारांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पहिला रोजगार मेळावा | **१४** | **११** | **१,६४४** | **३७८** | **७९** | **१०३** |
| २ | दुसरा रो.मेळावा | **६** | **३** | **७००** | **२२४** | **-** | **३६** |
| ३ | तिसरा रो.मेळावा | **११** | **७** | **१,२२६** | **७००** | **७१** | **-** |

**सेवासोसायटया :-**

जागतिकीकरण, यांत्रिकीकरण व संगणकाच्या वाढत्या वापरामुळे दिवसे दिवस रोजगाराच्या संधी कमी होत चालल्या असून दूसरीकडे लोकसंख्येची भरमसाठ वाढ , शिक्षणाचा प्रचार व प्रसार या मुळे सुशिक्षित बेरोजगारांची संख्या वाढतच आहे. बेरोजगार उमेदवारांना चालना देऊन त्यांना वैयक्तिकरित्या किंवा गटाने स्वयंरोजगाराकडे वळविणे हे शासनाचे धोरण आहे. शहरीभागातील लोकांच्या गरजा वेगवेगळया प्रकारच्या असतात. सदर गरजा /सेवा जर कोणाकडून ठराविक मोबदल्यात मिळणार असतील तर त्यांची सोय होणार असते. उदा. प्लंबर, इलेक्ट्रीशियन,वायरमन , सुतार, ड्रायव्हर , घरगुती उपकरण दुरुस्ती करणारे रेल्वे तिकीट काढून आणणे ही सर्वकामे रास्तमोबदल्यात एकाच ठिकाणाहून होत असतील तर ते लोकांना सोईचे होईल. यातून बेरोजगारांच्या सेवासोसायटया स्थापन करुन त्यांचे मार्फत या सर्व सेवा रास्त भावात सेवासोसायटी मार्फत केल्या जातात.

या सेवासोसायटयांना शासनाकडून आर्थिकदृष्टया बळकट करण्यासाठी शासनाकडुन व्यवस्थापकीय अनुदान दिले जाते.

**स्थापन झालेल्या सेवासोसायटया**

| कालावधी | महिला | कृषि | अभियांत्रिकी | अपंग | इतर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| मार्च २००४ पर्यन्त | १८ | ११ | १ | - | ४७ | ७७ |
| २००४-२००५ | ३ | ६ | - | - | १२ | २१ |
| २००५-०६ | ४ | ८ | १ | १ | २९ | ४३ |
| २००६-०७ | १ | ४ | १ | - | १७ | २३ |
| डिसे- ०७ अखेर | १ | ३ | १ | - | ७ | १२ |
| एकूण | २७ | ३२ | ४ | १ | ११२ | १७६ |

**सेवासोसायटीना दिलेल्या अनुदानाबाबतची माहिती.**

| वर्ष | प्राप्त अनुदान | पहिला हप्ता | | | दुसरा हप्ता | | | अनु दान वाटप केले ल्या सेवा सोसा एकूण संख्या | अनुदान दिलेल्या एकूण सभासद संख्या | एकूण खर्च रु.लाख ात |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अनुदान वाटप केलेल्या सेवा सोसा संख्या | सभा सद संख्या | वाटप अनुदान रु. | अनुदान वाटप केलेल्या सेवा. सोसा. संख्या | सभा सद संख्या | वाटप अनुदान रु. | | | |
| २००३-०४ | ७०१,२०० | ४९ | ५७८ | ६९३,६०० | - | - | - | ४९ | ५७८ | ६.९४ |
| २००४-०५ | ८७१,२०० | ३७ | ४७६ | ५७१,२०० | - | - | - | ३७ | ४७६ | ५.७९ |
| २००५-०६ | १,६००,००० | ३५ | ५१७ | ६२०,४०० | ४६ | ८१४ | ९७६,८०० | ८१ | १,३३१ | १५.९७ |
| २००६-०७ | १,६००,००० | २२ | ३१४ | ३७६,८०० | २० तिसरा हप्ता- ८ | ३७७ १८९ | ४५२,४००,२ २६,८०० | ५० | ८८० | १०.५ ६ |
| डिसे. ०७ अखेर | २,२८५,००० | - | - | - | दुसरा-६ तिसरा-११ | ९७ १६८ | ११६,४०० २०१६०० | १७ | २६५ | ३.१८ |

**सेवासोसायटयांना मिळालेली खाजगी व शासकीय कामे-**

| अ.क्र. | वर्ष | खाजगी कामे रु. | शासकीय कामे | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | २००४ पर्यन्त | १,६३७,६०१ | ४४५,९५१ | २,०८३,५५२ |
| २ | २००४-२००५ | १,०५४,७६३ | १,०५५,५०० | २,११०,२६३ |
| ३ | २००५-२००६ | २,५०१,८४८ | १,१३७,५१८ | ३,६३९,३६६ |
| ४ | २००६-२००७ | ४,०६६,६२८ | ४३२,३०९ | ४,४९८,९३७ |
| ५ | डिसें. -०७ अखेर | ४९७,२२० | - | ४३९,८१४ |
| | एकूण | १०,१६१,४१५ | ३,१०६,५०९ | १३,२६७,९२४ |

**मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ मर्यादित**:-

मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळातर्फे मुस्लीम, पारसी, शीख,ख्रिश्चन, बौध व जैन या अल्पसंख्यांक समाजातील आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील बेरोजगारांना स्वयंरोजगारासाठी आर्थिक सहाय्य करण्यांसाठी विविध योजनांमार्फत कर्ज उपलब्ध करुन देण्यांत येते. स्वयंरोजगारामुळे आर्थिक व सामाजिक उन्नत्ती तसेच समृध्दी व विकास व्हावा व अल्पसंख्याक बेरोजगारांनी स्वतःच्या पायावर उभे रहावे ही यामागची संकल्पना आहे.

अ) बीज भांडवल योजना :- या योजने अंतर्गत १८ वर्षे पूर्ण झालेल्या अल्पसंख्याक समाजातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील अर्जदारास रुपये ५ हजारापासुन रु.५ लाख पर्यत कर्ज घेता येईल. त्यापैकी ५० टक्के बॅकेमार्फत, ४५ टक्के महामंडळामार्फत व ५ टक्के लाभार्थ्याने स्वतः भरावयाचे

आहेत. महामंडळामार्फत दिल्या जाणा-या बीज भांडवलावर ४ टक्के इतके व्याज आकारण्यांत येते. या रक्कमेच्या परतफेडीची मुदत जास्तीत जास्त ५ वर्षे राहील. कर्जाची परतफेड एक ते तीन महिन्यानंतर सुरु करुन ती मुद्दल व व्याज मिळून भरावी लागते.

बॅकेमार्फत दिल्या जाणा-या कर्जावर बॅकेच्या प्रचलित अटी व व्याज दरानुसार परत फेड करावी लागेल. कर्जासाठी दोन सक्षम जामीनदार दयावे लागतील. या योजनेखाली यंत्र/साधन सामुग्री घ्यावयाची असेल तर ती तारण म्हणून ठेवावी लागेल. लाभार्थ्याकडून तारण उपलब्ध न झाल्यास जामीनदाराला तारण दयावे लागेल.

**ब) राष्ट्रीय अल्पसंख्यांक विकास व वित्त महामंडळ, नवी दिल्ली यांची कर्ज योजना :-**

**ब) मुदत कर्ज योजना :-** या योजनेमध्ये शासनाने विहीत केलेल्या अल्पसंख्याक समाजातील दुर्बल घटकातील १८ वर्षे पूर्ण झालेल्या अर्जदारास जास्तीत जास्त रुपये ५ लाख इतके कर्ज घेता येईल. यापैकी ८५ टक्के रक्कम राष्ट्रीय अल्पसंख्यांक महामंडळ, १० टक्के मौलाना आझाद महामंडळ, व ५ टक्के रक्कम अर्जदारास उभारावी लागेल. या कर्जावर ७ टक्के इतके व्याज आकारण्यांत येईल. कर्जासाठी दोन सक्षम जामिनदार द्यावे लागतील. या योजनेखाली यंत्र व साधनसामुग्री घेतली तर ती तारण म्हणुन ठेवावी लागेल. या कर्जाची परतफेडीची मुदत जास्तीत जास्त ५ वर्षे राहील. कर्जाची परतफेड एक ते तीन महिन्यानंतर सुरु होईल कर्जाचे हप्ते व त्यावरील व्याज दरमहा भरावे लागतील.

मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ मर्यादित मार्फत राबविण्यांत येणा-या बीज भांडवल कर्ज योजना व मुदत कर्ज योजनांचा तपशील खालील प्रमाणे-

**मौलाना आझाद आर्थिक मागास विकास महामंडळाची माहे डिसेंबर-२००७ अखेरची माहिती**

| जिल्हा | योजनेचे नाव | महामंडळाकडून प्राप्त संख्या | उमेदवारांना विक्री केलेल्याअर्जाची संख्या | उमेदवारांकडून भरुन प्राप्त अर्जांची संख्या | ाहामंडळाक डेपाठ विलेली प्रक-रणे | महामेंडळाकूडून कर्ज मंजूर प्रकरणे | कर्ज मंजूर रककम रुपये | एकूण वसूल करवयाची रक्कम | एकूण वसूल झालेली रक्कम | वसूल न झालेली रक्कम | वसूलीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सोलापूर | थेट कर्ज | **७९००** | **७८२५** | **२५** | **२०** | **६** | **१.८५** | **१०२,६६७** | **१०५,७२७** | **३८,९३७** | |
| | मुदत कर्ज | | | **८४१** | **६०६** | **५७१** | **३४,५०९,४५०** | **८५०४०६७** | **६५५७३४७** | **१९५६७२०** | |

**मौलाना आझाद आर्थिक मागास विकास महामंडळाची माहे डिसेंबर-२००७ अखेर कर्ज अर्ज विक्रीची तपशीलवार माहिती.**

| वर्ष | प्राप्त झालेले अर्ज | विक्री केलेले अर्ज | शिल्लक अर्ज | मंडळास फॉर्मविक्रीची पाठविलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| २००१-२००२ | ४,००० | २,७३४ | १,२६६ | १३,१६५ |
| २००२-२००३ | - | १,१२३ | १४३ | ४,९१० |
| २००३-२००४ | ८०० | ८५८ | ८५ | ५,९२५ |
| २००४-२००५ | ९०० | ९८५ | - | २,५०० |
| २००५-२००६ | २०० | १,१५० | ८५० | ५,७३० |
| २००६-०७ | - | ६०० | २५० | ४,९७० |
| डिसे-०७ अखेर | ७,९०० | ३०२ | ३० | - |
| एकूण | ७,९०० | ७,८७० | ३० | ३७,२०० |

**४) आण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ मर्यादित :-**

आण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील युवकाना स्वयंरोजगारासाठी आर्थिक सहाय्य करण्यांच्या दृष्टीने थेट कर्ज योजना, बीज भांडवल कर्ज व गट प्रकल्प योजना अंतर्गत कर्ज उपलब्ध करुन देण्यांत येते,यायोजनांची सविस्तर माहिती खालील प्रमाणे

**अ) थेट कर्ज योजना**:- या योजनेअंतर्गत महामंडळामार्फत जास्तीत जास्त रु.२५०००/- इतके थेट कर्ज देता येईल. या कर्जावर ७ टक्के इतके व्याज आकारण्यांत येईल. परतफेड वेळेत न केल्यास त्यावर २ टक्के म्हणजेच एकूण ९ टक्के दंडनिय व्याज आकारण्यांत येईल. या रक्कमेच्या परफेडीची मुदत जास्तीत जास्त ३ वर्षे राहील. परतफेडीचे हप्ते व्यवसायाच्या स्वरुपानुसार १ ते ३ महिन्यानंतर सुरु करुन मुद्दल व व्याज मिळून भरावे लागतील कर्जासाठी दोन सक्षम जामीनदार दयावे लागतील. या योजनेखाली यंत्रसामुग्री साधनसामुग्री घ्यावयाची असल्यास ती तारण म्हणून ठेवावी लागेल. सध्या सदरील योजनेस स्थगिती देण्यांत आलेली आहे.

**ब) बीज भांडवल योजना/ गट प्रकल्प योजना :-** आण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत राबविण्यांत येणा-या बीज भांडवल योजनेअंतर्गत कर्जाची कमाल मर्यादा रुपये ५ लाख इतकी असेल. बॅकांचा सहभाग ६० टक्के महामंडळाचा ३५ टक्के व लाभार्थ्याचा सहभाग ५ टक्के इतका असेल. महामंडळामार्फत दिल्या जाणा-या बीज भांडवलावर ४ टक्के इतके व्याज आकारण्यांत येईल. कर्जासाठी दोन सक्षम जामीनदार दयावे लागतील.

या योजनेखाली यंत्रसामुग्री/साधनसामुग्री घ्यावयाची असल्यास ती तारण म्हणुन ठेवावी लागेल. या रकमेच्या परतफेडीची मुदत जास्तीत जास्त ५ वर्षे राहील. परतफेडीचे हप्ते व्यवसायाच्या स्वरुपानुसार १ ते ३ महिन्यानंतर सुरु करुन मुद्दल व व्याज मिळून भरावे लागतील.

**आण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळा मार्फत राबविण्यांत येणा-या थेट कर्ज योजना.बीज भांडवल योजना व गट प्रकल्प योजनांचा तपशील खालील प्रमाणे -**

**१४) अण्णा साहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाची माहे डिसेंबर-२००७ अखेरची माहिती**

| जिल्हा | योजनेचे नाव | महामंडळ ाकडून प्राप्त संख्या | उमेदवारांना विक्री केलेल्या अर्जाची संख्या | उमेदवारांकडून भरुन प्राप्त अर्जांची संख्या | ाहामंडळाकडे पाठविलेली प्रक-रणे | महामेंडळाकूडन कर्ज मंजूर प्रकरणे | कर्ज मंजूर रककम रुपये | एकूण वसूल करव याची रक्कम | एकूण वसकूल झालेली रक्कम | वसूल न झालेली रक्कम | वसूलीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सोलापूर | थेट कर्ज | **५८००** | **५२२९** | **४८२** | **४८२** | **२४४** | **६१ लाख** | **२,२९९,८१०** | **१,११२,१३४** | **१,१८७,६७६** | |
| | बीज भांडवल | | | **३०** | **२९** | **१३** | **१,७७६४५२** | **३३६,८८७** | **२५०९५७** | **८५९३०** | |

## आण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ, सोलापूर वर्षनिहाय अर्ज विक्री व शिल्लक अर्ज तपशील.

| वर्ष | प्राप्त झालेले अर्ज | विक्री केलेले अर्ज | शिल्लक अर्ज | मंडळास फॉर्मविक्रीची पाठविलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| २००१-२००२ | - | - | - | - |
| २००२-२००३ | ५०० | १६८ | ३३२ | ११५०/- |
| २००३-२००४ | ६०० | ५०४ | ४२८ | - |
| २००४-२००५ | ३,७०० | ४,११३ | १५ | १६,७०५/- |
| २००५-२००६ | १,००० | १८० | ८३५ | ६०४५/- |
| २००६-०७ | - | १९९ | ६३६ | १९२५/- |
| डिसे-०७ अखेर | - | ६५ | ५७६ | - |
| एकूण | ५,८०० | ५,२२९ | ५८१ | २५८२५/- |

**मिटकॉन- स्वयंरोजगाराची यादी -**

**मिटकॉन कन्सल्टन्सी सर्व्हिसेस लिमिटेड, सोलापूर.**

**जिल्हयातील स्वयंरोजगाराच्या संधी- रुपरेषा**

| **क्षेत्र** | **उद्योग/धंदा** | **लघुसेवा/उद्योग/धंद्यास वाव** |
|---|---|---|
| **१ कृषि** | १. पीक संवर्धन | १. कृषि सेवा केंद्र, २. गांडूळ खत ३. आळंबी उद्योग. ४. वनौषधी प्रकल्प ५.भाजीपाला लागवड |
| | २. मत्स्यव्यवसाय | १. मासेमारी उद्योग. २. मत्स्य प्रक्रिया व साठवणूक ३. मत्स्य बीज निर्मिती |

| | | |
|---|---|---|
| | ३.पशुपालन व दुग्धव्यवसाय. | १. शेळीमेंढी पालन. २.गाई-म्हशी पालन. ३.वराह पालन. ४. ससे पालन. ५. कडबा कुट्टी उत्पादन.<br>६. दुध डेअरी |
| | ४. पोल्ट्री | कुक्कुट पालन |
| | ५. ॲग्रोप्रोसेसिंग | १. फळ प्रक्रिया उद्योग. २.बेदाणा निर्मिती उद्योग.<br>३. पॅकींग मटेरियल उत्पादन |
| २. **बांधकाम** | १. इमारत/रस्ते बांधकाम | १. खडी क्रशिंग उद्योग. २. विट उत्पादन<br>३. बांधकाम साहित्य वाहतूक सेवा |
| ३. **इतर उद्योग** | | १. पशुखाद्य कारखाना. २. हॉटेल. ३. बेकरी. ४.धाबा ५. खानावळ. ६. तेल घाणा. ७.मळणी यंत्र<br>८. भुईमुगाच्या शेंगा फोडणे. ९.किराणा दुकान व पिठाची गिरणी.<br>१०.कापडी पिशव्या उत्पादन.<br>११. गादी तयार करणे. १२.केश कर्तनालय. १३.ब्युटी पार्लर. १४. पिको फॉल. १५. लेडीज टेलरींग.<br>१६.रेडीमेड कपडे व गांधी टोप्या तयार करणे<br>१७ मंगल भांडार. १८ ॲटो सर्व्हीस स्टेशन.<br>१९ फूलोद्योग. २० विडी उत्पादन. २१ स्क्रीनप्रिटींग<br>२२. शालेय वहया उत्पादन<br>२३.मोबाईल विक्री व दुरुस्ती |
| ४ **पर्यटन, कॉमर्स व बिझनेस** | १. ट्रॅव्हल ॲण्ड टुरिझम | १. ट्रॅव्हलर्स एजन्सीज २. पर्यटन सेवा केंद्र. |

**<u>जिल्हयातील स्वयंरोजगाराच्या संधी</u>:-** या जिल्हयामध्यें सध्या स्वयंरोजगाराच्या विविध संधी असून त्याची उद्योगनिहाय माहिती -

| अ.क्र. | सेवा | व्यापार | उद्योग |
|---|---|---|---|
| १ | हॉटेल व्यवसाय | किराणा दुकान | फॅबिकेशन |
| २ | केटरींग | लाकडाची वखार | वीटभट्टी |
| ३ | पिठाची गिरणी | भाजीचे दुकान | रोपवाटीका |
| ४ | कांडप | बांगडी व्यवसाय | लोणची पापड तयार करणे |
| ५ | शिवणकाम (पुरुष) | कापड विक्री | अगरबत्ती तयार करणे |
| ६ | शिवणकाम (महिला) | महिलासाठी कापड दुकान | खडू तयार करणे |
| ७ | पिको फॉल करणे | पान विक्री | दुध उत्पादन,विक्री व दुग्धजन्य पदार्थ तयार करुन विक्री करणे. |
| ८ | मोटार रिवायडींग | हॉटेल | ग्रेप वाईन |
| ९ | लॉन्ड्री | विद्युत साहीत्य दुकान | ज्वारीपासून बिया तयार करणे |
| १० | सूतारकाम | चप्पल बनविणे | लिंबापासून पावडर करणे |
| ११ | केश कर्तनालय | शीत पेये केंद्र | बॉलपेन रिफीलस तयार करणे |
| १२ | रंगकाम | हार्डवेअर दुकान | टेक्सटाईल डाईंग, प्रिंटींग |
| १३ | मटण/चिकन दुकान | वर्तमान पत्र विक्री | |
| १४ | इंटरनेट कॅफे | भांडी दुकान | |
| १५ | गॅरेज | जनरल स्टोअर्स | |
| १६ | वाचनालय | पशुखाद्य विक्री | |
| १७ | शे्वई तयार करणे | कृषि सेवा केंद्र | |

| | | | |
|---|---|---|---|
| १८ | स्टोव्ह/गॅस शेगडी दुरुस्ती | बांधकाम साहित्य विक्री | |
| १९ | विहिरीतून गाळ काढण्याचे यंत्र | खानावळ | |
| २० | मळणी यंत्र | भंगार गोळा करणे | |
| २१ | फोटोग्राफी/व्हीडीओ शुटींग | संगणक विक्री दुरुस्ती | |
| २२ | स्पीकर व मंडप सेट | फुले व हार दुकान | |
| २३ | काम्प्युटर भाडयाने देणे | फळे विक्री | |
| २४ | मोबाईल दुरुस्ती | | |
| २५ | कुरीअर सेवा | | |
| २६ | फिरते उपहार गृह | | |
| २७ | ब्युटी पार्लर | | |
| २८ | स्क्रीन पेटींग ऑफसेट प्रिंटींग | | |